# निर्देश पत्र

## मिरा - भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय : स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प).
ता.जि.ठाणे ४०१ १०१. दुरध्वनी क्र. : २८१९२८२८ / २८१९३०८७

( ____________________ विभाग)

क्रमांक :

तारीख :

विषय मा. महासभा दि २२/७/२०१५ रोजी स. १०-०० वा. मा.महासभा सूचना क्र ०५ / १६-०७-१५ प्रकरण क्र ६१ ते ६५

प्रकरण सुरु झाल्याची तारीख :

प्रकरण बंद केल्याची तारीख :

| दिनांक | कार्यवाही |
| --- | --- |
| | (५) |
| | १५/१६ |

### अभिलेखाचे वर्गीकरण

| बाब क्रमांक | वर्ग | परिक्षणाचे वर्ष | पृष्ठ क्रमांक |
| --- | --- | --- | --- |
| | (अ / ब / क / त -१ /ड) | | १ ते |

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# <u>मिरा भाईंदर महानगरपालिका</u>

मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- १६/०७/२०१५.

## <u>मा. विशेष महासभा</u>

**मा. विशेष महासभा सूचना क्र. :- ०५, दिनांक १६/०७/२०१५**

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती.** ______________________

नगरसेवक/नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभा बुधवार दि. २२/०७/२०१५ रोजी सकाळी १०.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०५, दि. १६/०७/२०१५ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महापौर सो. यांच्या मान्यतेने.**

E/Backup- 2/D/MD/Nagarsachiv/Vishaypatrika/Vishaypatrika-Mahasabha 12-17

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

**मा. विशेष महासभा सुचना क्रमांक ०५, दि. १६/०७/२०१५ सोबतची विषय पत्रिका**
**सभा बुधवार दि. २२/०७/२०१५**

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| ६१ | केंद्र शासन व राज्य शासनामार्फत येणाऱ्या स्वच्छता अभियान महानगरपालिका कार्यक्षेत्रात राबविणेबाबत. |
| ६२ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात केंद्रशासन पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना प्रकल्पाची अंमलबजावणी करणेबाबत. |
| ६३ | महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील "कनिष्ठ अभियंता" यांना "शाखा अभियंता म्हणून दर्जोन्नतीसह श्रेणीवाढ देणेबाबत. |
| ६४ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात केंद्रशासन पुरस्कृत "स्मार्ट सिटी" व अमृत योजना प्रकल्पाची अंमलबजावणी करणेबाबत. |
| ६५ | सार्वजनिक रस्त्यांवर (फुटपाथ / फुटवेज) समारंभाच्या व उत्सवाच्या प्रसंगी मंडप किंवा असे काणेतेही अन्य बांधकाम तात्पुरते उभारण्यास परवानगी देण्यासाठी धोरण निश्चित करणेबाबत व सदरचे धोरण मार्गदर्शक सुचनांच्या स्वरुपात प्रसिध्द करणेबाबत. |

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

महानगरपालिका सचिव कार्यालय,
मिरा भाईंदर महानगरपालिका
दिनांक :- १६ जुलै २०१५

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.महासभा दिनांक :- २२।०५।२०१५

गोषवारा

६९

विषय :- **केंद्र शासन व राज्य शासन मार्फत राबविण्यात येणाऱ्या 'स्वच्छ भारत अभियान' महानगरपालिका क्षेत्रात राबविणेबाबत.**

**मा.पंतप्रधान महोदयांनी घोषीत केलेल्या स्वच्छ भारत अभियानाचा पहिला टप्पा दिनांक २.१०.२०१४ ते ०२.१०.२०१९ दरम्यान राबविणेबाबत शासनाचे पत्र क्र.२९.०९.२०१४ च्या संदर्भिय पत्रानूसार कळविण्यात आलेले आहे. सदर अभियानामध्ये खालील मूददेनिहाय कार्यवाही करणेबाबत सूचविले आहे.**

स्वच्छ भारत अभियानामध्ये –

१. स्वत:ची घरे व घराशेजारी स्वच्छता ठेवणे.
२. इमारतीच्या सभोवतालचा परिसर स्वच्छ करणे.
३. सार्वजनिक सौचालये दूरुस्त करणे व स्वच्छ ठेवणे.
४. हूतात्म्यांच्या पूतळयाची स्वच्छता राखणे.
५. सार्वजनिक जागेची स्वच्छता करणे व कचरा उचलणे.
६. शासकिय इमारती मधील अनावश्यक फर्निचर व दस्तावेज यांची विल्हेवाट लावणे.
७. जनजागृतीसाठी एन.जी.ओ.,विद्यार्थी, स्वयंसेवक, निवृत्त अधिकारी, कर्मचारी यांची मदत घेणे.

इत्यादी कामांचा समावेश करण्यात आलेला आहे.

**त्यानूसार मिरा भाईंदर महानगरपालिकेने खालीलप्रमाणे कार्यवाही केलेली आहे.**

१. मा.आयूक्त, उपायूक्त, अधिकारी, कर्मचारी यांनी स्वच्छ भारत अभियान अंतर्गत २ ऑक्टोबर २०१४ रोजी स्वच्छतेची शपथ घेऊन महानगरपालिका क्षेत्रातील मूख्य रस्ता छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर रस्ता सफाई करुन या अभियानास सूरुवात केलेली आहे.
२. स्वच्छ भारत अभियान अंतर्गत महानगरपालिका मूख्यालय आवारात असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पूतळा व पूतळयाच्या आजूबाजूचा परिसर साफसफाई केलेला आहे व वेळोवेळी तो स्वच्छ राहील याकडे लक्ष दिले जात आहे.
३. स्वच्छ भारत अभियान अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एकूण १७० सार्वजनिक शौचालये आहेत. त्यांचे पालकत्व ३५ अधिकाऱ्यांना देण्यात आले आहे. त्यांनी सदर शौचालयाची साफसफाई, देखभाल दूरुस्ती इत्यादी कामे वेळोवेळी करुन घ्यावयाची जबाबदारी देण्यात आलेली आहे.
४. महानगरपालिकेच्या एकूण ८५ सार्वजनिक मालमत्ता आहेत, त्यांचे सूध्दा पालकत्व देऊन साफसफाई करण्यात येत आहे.
५. स्वच्छ भारत अभियान अंतर्गत नागरिकामध्ये जनजागृती करणे कामी होर्डिंग्ज, पोस्टर्स, फलक इत्यादींच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे.

**महाराष्ट्र शासनाने केंद्र शासनाच्या धरतीवर दि.२९.०५.२०१५ रोजी स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत 'सप्तपदी स्वच्छतेची' संकल्पना मांडलेली आहे. त्यामध्ये खालील संकल्पनांचा समावेष केलेला आहे.**

१. माझे पहिले पाऊल सहभागाच्या ठाम निर्धाराचे.
२. दूसरे पाऊल व्यापक लोकसहभाग मिळविण्याचे.
३. तिसरे पाऊल १०० टक्के शौचालयाचा वापर करण्यास प्रवृत्त करण्याचे.
४. चौथे पाऊल कचऱ्याचे संकलन, वर्गीकरण, वाहतूक करण्याचे.

५. पाचवे पाऊल कचऱ्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करणे.

६. सहावे पाऊल सांडपाण्यावर प्रक्रिया करणे.

७. सातवे पाऊल हरित स्वच्छ महाराष्ट्र साकारण्याचे.

अशाप्रकारे स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत मा.मुख्यमंत्री महोदयांनी 'सप्तपदी स्वच्छतेची' ही संकल्पना मांडून त्याप्रमाणे कार्यवाही करण्याचे आवाहन केलेले आहे. आणि त्याकरिता खालीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

१. उपरोक्त मोहीमेकरिता मोठया प्रमाणात जनजागृती करणे आवश्यक आहे.

२. प्रत्येक प्रभाग समिती मध्ये 'स्वच्छतादूत' नेमून केंद्र व राज्य शासनाच्या या अभियानाची जनजागृती करणे व मिरा भाईंदर शहर स्वच्छ करण्यासाठी लोकसहभाग वाढविणे अपेक्षित आहे.

३. मिरा भाईंदर शहरामध्ये एकूण ३० ठिकाणी उघडयावर शौचालयास बसले जाते. यास प्रतिबंध करण्यासाठी त्यांना पूरेसे शौचालय केंद्र, राज्य शासन व खाजगी जागेवर शौचालय बांधणे आवश्यक आहे. शौचालयासाठी जागा मिळण्यासाठी पाठपूरावा करणे, केंद्र व राज्य शासनाचा मिळणारा निधी तसेच आवश्यकता पडल्यास महापालिकेचा निधी उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे.

४. शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी खालील नमूद गोष्टींवर प्रतिबंध करणे आवश्यक आहे.

- रस्त्यावर कचरा फेकणे.
- रस्त्यावर सार्वजनिक ठिकाणी थुंकणे.
- उघडयावर सौचास बसणे.
- सार्वजनिक ठिकाणी व रस्त्यावर कपडे धूणे.
- सार्वजनिक ठिकाणी व रस्त्यावर आंघोळ करणे.
- सार्वजनिक ठिकाणी व रस्त्यावर टाकाऊ बांधकाम साहित्य, दगड, विटा रस्त्यावर फेकणे.
- सार्वजनिक ठिकाणी व रस्त्यावर फेरीवाले, दूकानदार यांचेकडून कचरा व टाकाऊ पदार्थ रस्त्यावर टाकणे.
- ५० माइक्रोनपेक्षा कमी जाडीच्या कॅरीबॅग वापर करणे.

इत्यादीवर प्रतिबंध करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेने यासाठी घनकचरा व्यवस्थापन उपविधी २०११ मध्ये मंजूर करुन शासनास पाठविलेले आहे. त्यानूसार दंडात्मक कार्यवाही करणेकरिता **'क्लिनअप'** मार्शल नेमल्यास उपरोक्त उपविधीची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे शक्य होईल.

महापालिका क्षेत्रात सर्वाचे सहकार्य घेऊन हे 'स्वच्छ सुंदर मिरा भाईंदर' करण्यास सर्वाचे सहकार्य आवश्यक आहे व त्यासाठी आपण सर्वानी स्वच्छतेची शपथ घेऊन त्याचे पालन करणे गरजेचे आहे.

उपरोक्त कामी केंद्र व राज्य शासनाने दिलेल्या सूचनेनूसार स्वच्छता अभियान अंतर्गत आवश्यक असणारी सर्व कामे करण्यास आर्थिक व प्रशासकिय मंजूरी मिळण्यास शिफारस आहे.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

16/03/15

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.२२/०७/२०१५

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( ६२ ) :-** मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात केंद्र शासन पुरस्कृत "प्रधान मंत्री आवास (PMAY) योजना" प्रकल्पाची अमंलबजावणी करणेबाबत...

केंद्र शासनामार्फत लोकांच्या रहाणीमानाचा दर्जा सुधारण्यासाठी शहरामध्ये "प्रधान मंत्री आवास योजना" (PMAY) राबविण्याबाबतची घोषणा मा. प्रधानमंत्री महोदय यांनी केली आहे. त्या अनुषंगाने केंद्र शासनामार्फत त्यांच्या संकेत स्थळावर (website) सदर योजनेची मार्गदर्शक तत्वे प्रसिध्द केलेली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेची लोकसंख्या सुमारे १०.०० लक्ष एवढी असून शहराचे क्षेत्र ७९.४० चौ.कि.मी. आहे. शहरात एकूण ४६ झोपडपट्ट्या असून झोपडपट्ट्याचे क्षेत्र सुमारे २८३ एकर असून झोपडपट्ट्यातील लोकसंख्या १.५० लक्ष एवढी आहे. सदर झोपडपट्ट्या ह्या खाजगी, केंद्र शासन व राज्य शासन यांच्या जागेत वसल्या आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सदर योजना राबवून झोपडपट्टीचा विकास व लोकांना परवडणारी घरे उपलब्ध करून शहराचा विकास सदर योजनेतून करण्यात येणार आहे. सदर प्रकल्पाबाबत पुढील सुचना प्राप्त होताच सदर योजनेची अंमलबजावणी करावी लागणार आहे. केंद्र शासनामार्फत सन २०१५ ते सन २०२२ या कालावधीत शहरी भागात 'सर्वांसाठी घरे' या मिशन मधून "प्रधान मंत्री आवास योजना" (PMAY) राबविण्यात येणार आहे.

**<u>प्रकल्पाची उद्दीष्टे :-</u>**

१) सदर योजनेव्दारे सन २०२२ अखेर पर्यंत सर्वांसाठी घरे उपलब्ध करणे

२) झोपडपट्टी मधील रहिवाश्यांचा राहणीमानाचा दर्जा उचांवणे

३) प्रत्येक पात्र लाभार्थ्यांस रु.३०.०० चौ.मी. (३२३.०० चौ. फुट) एवढ्या चटई क्षेत्राचे घर उपलब्ध करून देणे.

४) सुमारे ३०० लोकसंख्या असलेल्या झोपडपट्टीमध्ये सदर योजना राबविता येईल.

५) झोपडपट्टी मुक्त शहराचा आराखडा तयार करणे.

६) महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टीसाठी कृती आराखडा तयार करणे व त्यानूसार झोपडपट्टी मुक्त करण्याच्या कार्यक्रमाचे टप्पे तयार करणे.

७) झोपडपट्टी धारकांचे सामाजिक व आर्थिक सर्व्हेक्षण करणे. (अ) टोटल स्टेशन ब) बायोमॅट्रीक सर्व्हेक्षण)

८) शहराचे जी.आय.एस. मॅपिंग करणे

सदर प्रधानमंत्री आवास योजनेचे काम तीन टप्प्यामध्ये होणार आहे

प्रथम टप्पा – एकूण १०० शहरासाठी

व्दितिय टप्पा – एकूण २०० शहरासाठी

तृतिय टप्पा - उर्वरीत शहरासाठी

तरी सदर "प्रधान मंत्री आवास योजना" (PMAY) हा प्रकल्प मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात राबविणेबाबत विचार विनिमय होऊन निर्णय होण्यास शिफारस आहे.

**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
16/07/15

PC-2/YJ/2015-16/MG-2

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि. २२/०७/२०१५

## // गोषवारा //

**प्रकरण क्र (63) – महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील "कनिष्ठ अभियंता" यांना "शाखा अभियंता" म्हणून दर्जोन्नतीसह श्रेणीवाढ देणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका मुंबई उपनगरास लागून असून मिरा भाईंदर नगरपालिकेची "ब" वर्ग मध्ये दि.१२/०६/१९८५ रोजी स्थापना होवून नगरपालिकेचे दि.२८/०८/१९९६ रोजी "अ" वर्गामध्ये रुपांतर झालेले आहे. त्यानंतर दि.२८/०२/२००२ पासून "ड" वर्ग महानगरपालिका अस्तित्वात आलेली आहे. सन १९९१ च्या जनगणनेप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिकेतील लोकसंख्या १७५३७२ व सन २००१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ५२०३८८ तसेच सन २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ८०९३७८ असून सद्यस्थितीत अंदाजे ११ लक्ष आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर एकूण २० कनिष्ठ अभियंते विविध विभागामध्ये कार्यरत असून यापैकी बहुतांश कनिष्ठ अभियंत्यांची सेवा १० ते १२ वर्षाची झालेली आहे. सदरचे कनिष्ठ अभियंते शासनाच्या पाटबंधारे विभागाच्या जा.क्र. सी.डी.एस.१५८२/१५८(२१५)/आ(१०), दि.१६/०४/१९८४ तसेच ग्रामविकास व जलसंधारण विभागासाठीच्या जा.क्र. झेडएनजी/१०७०/प्र.क्र.२६४/११, दि.२६/०४/२००१ अन्वयेच्या निर्णयासह नवी मुंबई महानगरपालिकेप्रमाणे व महानगरपालिकेसाठी शासनाने मंजूर केलेल्या "सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण नियम" याप्रमाणे कनिष्ठ अभियंता या पदावर ५ वर्षे सेवा पूर्ण झालेनंतर शाखा अभियंता (वर्ग-२) म्हणून श्रेणीवाढ मिळणेस सन २००८ पासून मागणी करित असून त्यांना अद्यापपर्यंत श्रेणीवाढ देण्यात आलेली नाही.

मिरा भाईंदर शहराच्या हद्दीचा विचार करता भविष्यामध्ये महानगरपालिकेची हद्द वाढून महानगरपालिकेच्या कर्मचा-यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध होण्याची शक्यता फारच कमी असल्यामुळे तसेच महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अनुभवी, कुशल कनिष्ठ अभियंते यांची कुंठिता घालविण्याच्या दृष्टीकोनातून व मिरा भाईंदर महानगरपालिकेसाठी शासनाने मंजूर केलेल्या "सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण नियम" यामधील तरतुदी यांचा विचार करता शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे तसेच महानगरपालिकेसाठीच्या मंजूर "सेवा प्रवेश व सेवा वर्गीकरण नियम" प्रमाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील ५ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या कनिष्ठ अभियंत्यांना "शाखा अभियंता" (वर्ग-२) या संवर्गात दर्जोन्नतीसह श्रेणीवाढ देण्यासाठीचा विषय दि.१३/०७/२०१५ रोजीच्या मा. महासभेमध्ये आला असता, सदर विषयांचा गोषवारा नसल्यामुळे सदरचा विषय पुढील मा. महासभेमध्ये घेणेबाबत मा. महासभेने निर्देश दिलेले आहेत. त्याप्रमाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील ५ वर्ष सेवा पूर्ण झालेल्या कनिष्ठ अभियंत्यांना "शाखा अभियंता" (वर्ग-२) या संवर्गात दर्जोन्नतीसह श्रेणीवाढ देणेबाबत निर्णय होणेसाठी मा. महासभेस विनंती आहे.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २२/०७/२०१५

## //गोषवारा//

(७)

**प्रकरण क्रमांक ( ६४ ) :-** मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात केंद्र शासन पुरस्कृत "स्मार्ट सिटी" व "अमृत योजना" (Atal Mission for Rejuvenation and urban Transformation) प्रकल्पांची अंमलबजावणी करणेबाबत.

केंद्र शासनामार्फत लोकांच्या जीवनमानाचा दर्जा सुधारण्यासाठी, स्वच्छ, शास्वत व पर्यावरणपूरक शहरे तयार करण्यासाठी "स्मार्ट सिटी" व अमृत योजना (Atal Mission for Rejuvenation and urban Transformation) प्रकल्पाची अभियान या महत्त्वकांक्षी प्रकल्पांची घोषणा मा. पंतप्रधान महोदयांनी दिनांक.२५/०६/२०१५ रोजी केली आहे. त्याअनुषंगाने केंद्र शासनामार्फत आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळेमध्ये "स्मार्ट सिटी" व अमृत योजना (Atal Mission for Rejuvenation and urban Transformation) योजनेच्या मार्गदर्शक सुचना प्रकाशित करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार केंद्रशासनाने "स्मार्ट सिटी" योजनेसाठी मार्गदर्शक तत्वे तयार केली असून राज्य शासनाकडून सदर योजनांच्या अंमलबजावणीसाठी शासन निर्णय व सदर मार्गदर्शक तत्वे मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे प्राप्त झालेली आहेत.

सदर प्रकल्पातंर्गत नागरीकांना आवश्यकेतनुसार पाणी पुरवठा, शाश्वत विद्युत पुरवठा, सॅनिटेशन व घनकचरा व्यवस्थापन, कार्यक्षम परिवहन व वाहतुक व्यवस्था सर्वांसाठी परवडणारी घरे विशेषतः गरीबांसाठी, आयटी कनेक्टीविटी (IT-Connectivity) ई-गव्हर्नन्स (E-Governance), नागरीकांचा सहभाग, उत्तम पर्यावरण, सर्व नागरीकांसाठी विशेषतः महिला, मुले व वृध्द यांना निर्भय सुरक्षा यंत्रणा, नागरीकांना सर्वांगीण आरोग्य व शिक्षण व्यवस्था या व इतर मुलभुत बाबींचा समावेश "स्मार्ट सिटी" अभियानांत समावेश करण्यात आला आहे. तसेच पुढील अद्ययावत उपयांचा (Smart Solution) समावेश करण्यात आला आहे. नागरीकांच्या तक्रारींचे इलेक्ट्रानिक पध्दतीचा वापर करुन निवारण करणे, सी.सी. टी.व्ही./ व्हिडीओ द्वारे गुन्हांवर नियंत्रण, घनकचरा व्यवस्थापनामध्ये कचऱ्यावर प्रक्रीया करुन विद्युत/ इंधन/ खत निर्मिती करणे, सांडपाण्यावर प्रक्रिया करणे, बांधकाम व निष्काषण कचरा व्यवस्थापन, पाणी पुरवठा व्यवस्थापनामध्ये जलमापक व्यवस्थापन, पाणी गळती शोध, प्रतिबंधात्मक दुरुस्ती (Preventive Maintenance) तसेच पाण्याची गुणवत्त वाढविणे, विद्युत मीटर व्यवस्थापन, अपांरपारीक उर्जा स्त्रोताचा वापर, ग्रीन बिल्डींग, दळणवळण वाहतुकीमध्ये कार्यक्षम सार्वजनिक वाहतुक व्यवस्थापन, कार्यक्षम पार्किंग व्यवस्था, औषधे व शिक्षणासाठी टेली-व्यवस्थापन, व्यावसायिकभिमुख प्रशिक्षण सेंटर्स इ.

**अमृत योजना (Atal Mission for Rejuvenation and urban Transformation)**

या योजनेमध्ये प्रामुख्याने पाणी पुरवठा व्यवस्थापन, मलनिस्सारण व्यवस्था, सिव्हरेज, पावसाळी गटार योजना, शहर परिवहन, मल्टीलेव्हल पार्किंग, जलवाहतुक (FERRY), फुटपाथ, स्काय वॉक, सायकल ट्रॅक, मुलांसाठी उद्याने, हरित पट्टे व पार्कस इ. बाबींचा समावेश आहे. एक लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या ५०० शहरांचा अमृत योजनेमध्ये समावेश करण्यात येणार आहे.

**स्मार्ट सिटी प्रकल्प**

सदर योजना दोन टप्प्यामध्ये राबविण्यात येणार आहे.

अ) प्रथम टप्पा :- केंद्र शासनामार्फत प्राप्त मार्गदर्शक सुचनानुसार प्रथम टप्प्यामध्ये एक लक्षापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरातुन स्पर्धात्मक पध्दतीत १० शहराची निवड करुन सदर शहराची शिफारस केंद्र शासनाकडे केली जाणार आहे.

ब) दुसरा टप्पा :- राज्य शासनामार्फत निवड करण्यात आलेले शहरांनी मार्गदर्शक सुचनेनुसार "स्मार्ट सिटी" प्रस्ताव तयार करुन आंतरराजीय "स्मार्ट सिटी" चॅलेंजमध्ये सादर करणे अपेक्षित आहे.

सदर केंद्र शासन पुरस्कृत "स्मार्ट सिटी" प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु असून मिरा भाईंदर शहराची निवड होणेसाठी स्पर्धात्मक विहीत गुणांक तक्ता (स्कोअर कार्ड) भरुन प्रवेश पत्र राज्य शासनाकडे सादर करण्यात आलेला आहे. शासन परिपत्रक क्रमांकः- स्मार्ट सिटी/२०१५/ प्र.क्र.१३०/नवि-३३ दि.१ जुलै २०१५ नूसार सदर प्रकल्पाच्या अनुशंगाने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थानी खालील मुद्यांची पुर्वतयारी करण्याचे आदेशित केले आहे.

अ) संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्था स्मार्ट सिटी अभियानांतर्गत ५ वर्षाच्या कालावधीकरीता प्रतिवर्ष ५० कोटी इतका निधी स्वहिस्सा म्हणून उभा करु शकेल याबाबत संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षमतेचा व नियोजनाचा तपशील.

ब) संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्था स्मार्ट सिटी अभियानांतर्गत ५ वर्षाच्या कालावधीकरीता प्रतिवर्ष २०० कोटी इतका निधी खर्च करु शकेल याबाबत संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यकारी क्षमतेचा व नियोजनाचा तपशील.

क) स्मार्ट सिटी अभियानामध्ये नागरीकांचा सहभागाबाबत संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे नियोजन.

ड) स्मार्ट सिटी अंमलबजावणीबाबतचा संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा दुरदृष्टीकोन (Vision)

तरी स्पर्धात्मक धोरणातुन मिरा-भाईंदर महानगरपालिकेची निवड सदर योजनेकरीता झाल्यास शहराचा विकास होण्यास व स्मार्ट सिटी म्हणून मिरा-भाईंदर शहराचा समावेश होईल.

तरी सदर "स्मार्ट सिटी" व "अमृत योजना" (Atal Mission for Rejuvenation and urban Transformation) प्रकल्प मिरा-भाईंदर शहरामध्ये राबविणेबाबत विचारविनीमय होऊन निर्णय होणेस शिफारस आहे.

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका
16/7

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि. २२/७/२०१५**

**// गोषवारा //**

**प्रकरण क्र.( ६५ ) सार्वजनिक रस्त्यावर (फुटपाथ-फुटवेज) समारंभाच्या व उत्सवाच्या प्रसंगी मंडप किंवा असे कोणतेही अन्य बांधकाम तात्पुरते उभारण्यास परवानगी देण्यासाठी धोरण निश्चित करणेबाबत व सदरचे धोरण मार्गदर्शन सुचनांच्या स्वरूपात प्रसिध्द करणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात गणपती व नवरात्रोत्सव, रमजान महिना, बकरी ईद, मोहरम, नाताळ, १४ एप्रिल (डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती), ६ डिसेंबर (महानिर्वाण दिन) व सर्व धर्मीय उत्सव, सण रस्त्यावर साजरे केले जातात. या उत्सवा दरम्यान मोठया प्रमाणात मंडप उभारण्यासाठी विविध संस्था महानगरपालिकेकडे अर्ज करीत असतात. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २३४ अन्वये पोलिस कार्यालयाच्या संमतीने रस्त्यावर मंडप उभारण्यासाठी महापालिका आयुक्त परवानगी देऊ शकतात.

सार्वजनिक उत्सवाच्यावेळी बहुतेक मंडळे ही महानगरपालिकेच्या वाहतुकीच्या रस्त्यावर मंडप उभारणी करतात, अशावेळी परिसरात असलेल्या नागरीकांना तसेच वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन कायदा व सुव्यस्थेचा प्रश्न निर्माण होतो. समारंभाच्या व उत्सवाच्याप्रसंगी रस्त्यावर उभारण्यात येत असलेल्या मंडप संदर्भात व ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० ची अंमलबजावणी करण्यासंदर्भात डॉ. महेश बेडेकर यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्र. १७३/२०१० सोबत सिव्हिल ॲप्लिकेशन क्र. १२४/२०१४ दाखल केली आहे. सदर याचिकेमध्ये मा. उच्च न्यायालयाने दि. १३/३/२०१५ व २४/६/२०१५ रोजीच्या आदेशात समारंभाच्या व उत्सवाच्या प्रसंगी रस्त्यावर उभारण्यात येत असलेल्या मंडपसंदर्भात सविस्तर विवेचन करून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २३४ अन्वये महानगरपालिकांच्या आयुक्तांना असलेल्या अधिकारांचा वापर करण्याकरीता महानगरपालिकांनी धोरण तयार करून मार्गदर्शक सुचनांच्या स्वरूपात प्रसिध्द करण्याबाबत आदेशित केले आहेत. सदरचे धोरण सर्व समाजांच्या व धर्माच्या उत्सवांना लागू राहतील व सदर धोरणास महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्याबाबत व सदरचे धोरण प्रतिज्ञापत्राद्वारे मा. उच्च न्यायालयात विहित कालावधीत सादर करणेस आदेशित केले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने शासन परिपत्रक क्र. याचिका २०१५/ सं.क्र.८७८(१)/नवि ३४, या शासन निर्णयाद्वारे सर्व महानगरपालिकांना मा. उच्च न्यायालयाने

(२)

दि. १३/३/२०१५ व २४/६/२०१५ रोजी दिलेल्या आदेशांचे पालन करावे व यासंदर्भात विहित कालावधीत कार्यवाई करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मा. उच्च न्यायालयात व शासनास सादर करण्यास निर्देशित केलेले आहे. तसेच दि. १५/७/२०१५ रोजी या विषयांसंदर्भात मा. सचिव, नगरविकास विभाग यांच्याकडे झालेल्या बैठकीत व्हिडियो कॉन्फरन्स मध्ये सर्व महानगरपालिकांना सदरचे धोरण निश्चित करण्याकरीता मा. महासभेची मंजूरी घेणेस आदेशित केले आहे.

ठाणे महानगरपालिकेने रस्त्यावर समारंभाच्या व उत्सवाच्या प्रसंगी मंडप किंवा असे कोणतेही अन्य बांधकाम तात्पुरता उभारण्यात परवानगी देण्यासाठी मार्गदर्शक तत्वे २०१५ तयार केलेली आहेत. त्या अनुषंगाने सण साजरे करताना पर्यावरणास त्रास होणार नाही व रहदारीस अडथळा होणार नाही याकरीता मा. उच्च न्यायालयाने घालून दिलेल्या नियमांचे दिशा निर्देश सार्वजनिक मंडळाकडून उचित पालन होण्यासाठी, मिरा भाईंदर महानगरपालिकेतील जनभावनांचा मान राखून व जनजीवन विस्कळीत होऊ न देता, ठाणे महानगरपालिकेने तयार केलेल्या धोरणाच्या धर्तीवर मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यावर समारंभाच्या व उत्सवाच्या प्रसंगी मंडप किंवा असे कोणतेही अन्य बांधकाम तात्पुरते उभारण्यास परवानगी देण्यासाठी धोरण निश्चित होण्यास शिफारस आहे.

(अच्युत हांगे) १७/०७/१५

आयुक्त

मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. 17/7/2015
12:40 AM

[signature]

गोषवारा प्राप्त दि.  /  /20  वेळ ........
मा. स्थायी समिती / महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. ..........................

लिपीक
नगरसचिव विभाग.

प्रदूषण नियंत्रण कक्ष
ठाणे महानगरपालिका

श्री. संजीव जयस्वाल (भा.प्र.से.)
आयुक्त

## प्रस्तावना

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात गणपती व नवरात्रोत्सव, रमझान महिना, बकरी ईद, रमझान ईद, मोहरम, नाताळ, १४ एप्रिल (डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती), ६ डिसेंबर (महानिर्वाण दिन) व सर्व धर्मीय उत्सव, सण रस्त्यांवर साजरे केले जातात. या उत्सवा दरम्यान मोठया प्रमाणात मंडप उभारण्यासाठी विविध संस्था महानगरपालिकेकडे अर्ज करीत असतात. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २३४ अन्वये मा. पोलीस आयुक्त यांच्या सहमतीने रस्त्यावर मंडप उभारण्यासाठी मा. महापालिका आयुक्त परवानगी देऊ शकतात.

सार्वजनिक उत्सवाच्या वेळी बहुतेक मंडळे ही महानगरपालिकेच्या वाहतुकीच्या रस्त्यावरच मंडप उभारणी करतात, अशावेळी परिसरात असलेल्या नागरिकांना तसेच वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. सार्वजनिक उत्सवामध्ये तात्पुरत्या स्वरुपात बांधलेल्या मंडपाचा अडथळा होऊ नये, तसेच सार्वजनिक उत्सवही साजरे करता यावेत व परिसरातील नागरीक व रहदारीला कमीत कमी त्रास व्हावा या दृष्टीकोनातून वेळोवेळी ठाणे महानगरपालिकेने मार्गदर्शक तत्त्वे व कार्यालयीन पध्दती तयार केलेली आहे.

डॉ. महेश बेडेकर वि. महाराष्ट्र शासन व इतर जनहित याचिका क्र. १७३/२०१० अन्वये मा. उच्च न्यायालयाने सार्वजनिक उत्सव साजरे करताना रहदारीस अडथळा होणार नाही, तसेच ध्वनी क्षेपकामुळे होणारे प्रदूषण नियंत्रित करणे व नागरीकांसाठी प्रभावी तक्रार स्वीकारण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्याचे निर्देश दिलेले आहेत व निर्देशाची अंमलबजावणी करण्याबाबत मा. मुख्य सचिवांकडे धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत विचारणा केली आहे.

त्याअनुषंगाने सण साजरे करताना पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही, ध्वनी प्रदूषण होणार नाही व रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही. मा. उच्च न्यायालयाने घालून दिलेल्या नियमांचे दिशा निर्देश सार्वजनिक मंडळाकडून उचित पालन होण्यासाठी, ठाणे महानगरपालिकेतर्फे जनभावनांचा मान राखून आणि जनजीवन विस्कळीत होऊ न देता जनहितार्थ मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यात आलेली आहे. तसेच सदर प्रकरणी नागरिकांच्या तक्रारी स्वीकारण्यासाठी तक्रार निवारण व्यवस्था निर्माण केलेली असून सदर सुविधेस उचित प्रसिध्दी देण्यात येत आहे.

सदर मार्गदर्शक तत्त्वांमुळे सार्वजनिक उत्सव शांततेत व सुरळीत जनजीवन विस्कळीत न होता साजरे करण्यास निश्चितच मदत होईल असा मला विश्वास आहे.

संजीव जयस्वाल

**मार्गदर्शक तत्वे :-**

- **अर्ज सादर करण्याची पध्दती :**

१. सार्वजनिक उत्सवाच्या प्रसंगी रस्ता/सार्वजनिक ठिकाणी मंडप/स्टेशन इ. उभारण्यास परवानगी मिळणेबाबत संबंधित मंडळाने विहित नमुन्यात सार्वजनिक उत्सवाच्या ३० दिवस अगोदर अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग (मु)/संबंधित परिमंडळाचे उपायुक्त / प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त यांचेकडे अर्ज करणे आवश्यक आहे.

२. संबंधित मंडळाने मागणी केलेल्या ठिकाणी मंडप/स्टेज इ. उभारणेसाठी रस्त्याच्या १/४ भागापेक्षा अधिक असणार नाही व सार्वजनिक वाहतुकीस अडथळा येणार नाही व नागरिकांना त्यापासून उपद्रव तसेच आक्षेपार्ह होणार नाही याची दक्षता संबंधित मंडळाने घ्यावयाची आहे. मंडप/स्टेज इ. उभारणेकरिता प्रचलित आकाराचा तक्ता खालीलप्रमाणे :-

| रस्त्याची रुंदी | मंडप/स्टेजसाठी दिली पाहिजे अशी कमाल रुंदी | मोकळी/खुली असली पाहिजे अशी रस्त्याची रुंदी |
|---|---|---|
| २५ फुट | ६.२५ फुट | १८.७५ फुट |
| ५० फुट | १२.५ फुट | ३७.५ फुट |
| ७० फुट | १७.५ फुट | ५२.५ फुट |

- ना हरकत दाखला :

३. संबंधित मंडळाने मागणी केलेल्या ठिकाणी मंडप/स्टेज इ. उभारणेसाठी परवानगी देणेपूर्वी शहर वाहतूक पोलीस शाखा, स्थानिक पोलीस स्टेशन व महापालिकेच्या अग्निशमन विभाग यांचे ना हरकत दाखला तीन दिवसांचे आत सादर करणे आवश्यक आहे.

- पूर्व इतिहास :

४. मागील वर्षी ज्या मंडळांना मंडप/स्टेज इ. उभारणेसाठी ज्या जागेवर परवानगी देण्यात आली होती. त्याच जागेवर अर्जाच्या वेळी परवानगी देण्यात येईल. परंतू प्रशासकीय आवश्यकतेनुसार ठाणे महानगरपालिका सदर बाबीमध्ये योग्य तो बदल करु शकते.

५. मागील वर्षी ज्या आकाराचा मंडप/स्टेज इ. उभारणेसाठी परवानगी देण्यात आली होती. तेवढयाच आकाराचा किंवा रस्त्याच्या १/४ भाग यापैकी जे कमी असेल त्या आकाराचा मंडप/स्टेज इ. उभारणेसाठी परवानगी देण्यात येईल. ठाणे महानगरपालिका आवश्यकतेनुसार मंडप उभारण्याची परवानगी द्यावी किंवा नाही याबाबत स्वेच्छाधिकार अबाधित ठेवत आहे. तसेच मंडप/स्टेज आकार कमी करण्याचे निर्देशसुध्दा मंडळांना देऊ शकते.

१३. कोणत्याही ठिकाणी ८ फुट व त्यापेक्षा कमी असलेल्या रस्त्याच्या जागेत मंडप/स्टेज इ. उभारणीकरिता परवानगी महानगरपालिकेकडून देण्यात येणार नाही. मंडप/स्टेज इ. चे अंतर विद्युत तार व डी.पी. बॉक्स पेक्षा ६ फुट अंतरावर ठेवणे संबंधित मंडळावर बंधनकारक आहे.

१४. सार्वजनिक उत्सवांकरिता आवश्यक विद्युत कनेक्शन महापालिकेच्या कोणत्याही रस्त्यावरील विद्युत पोलमधून घेता येणार नाही. असे आढळून आल्यास संबंधित मंडळावर दंडात्मक कारवाई करुन त्यांची परवानगी रद्द करण्यात येईल.

१५. संबंधित मंडळाला महानगरपालिकेने परवानगी दिलेल्या जागी उभारण्यात आलेल्या मंडपापासून जास्तीत जास्त १५ मीटर अंतरापर्यंतच विद्युत रोषणाई करता येईल.

- शुल्क वसुली :

१६. ठाणे महानगरपालिका हद्दीतील रस्ता/सार्वजनिक ठिकाणी उत्सव, सण, धार्मिक कार्यक्रम तसेच वैयक्तिक कारणांसाठी मंडप / स्टेज उभारणेसाठी यापूर्वी मा. महासभेने पारित केलल्या ठरावाप्रमाणे आवश्यक शुल्काची वसुली संबंधित मंडळांकडून करण्यात येईल.

- परवानगी कालावधी :

१७. सार्वजनिक रस्ते तात्पुरते व्यापण्यासाठी किंवा त्यावर उभारणी करण्यासाठी सर्वसामान्यपणे खाजगी उत्सव किंवा समारंभ यांचेबाबतीत पाच दिवस किंवा सार्वजनिक उत्सव किंवा समारंभ यांच्या बाबतीत पंधरा दिवस ह्यापेक्षा जास्त कालावधीसाठी परवानगी देण्यात येणार नाही.

- ध्वनी प्रदूषण तक्रारीबाबत कार्यपध्दती :

१८. सार्वजनिक ठिकाणी वातावरणात दिवसेंदिवस ध्वनीची तीव्रता औद्योगिक कामे, विविध प्रकारची बांधकामे, जनित्रे (जनरेटर्स), ध्वनिवर्धक (लाऊड स्पीकर्स), सार्वजनिक सभा, संगीत वाद्ये, वाहनांचे भोंगे व इतर यांत्रिक साधनांमुळे ध्वनीचे प्रमाण वाढतच आहे. ध्वनी प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर व मानसिक स्वास्थ्यावर अनिष्ट परिणाम होत असल्यामुळे तसेच वातावरणातील ध्वनीची योग्य पातळी राखण्याच्या हेतूने ध्वनी निर्माण करणाऱ्या स्त्रोतांचे नियमन व नियंत्रण करणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय दि. २१ एप्रिल २००९ अन्वये ध्वनी प्रदूषण (नियंत्रण व नियमन) नियम २००० ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी प्राधिकरणाची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

१९. बांधकाम प्रकल्पाच्या ठिकाणी ध्वनी प्रदूषण करणारी उपकरणे / स्त्रोत जसे D.G. Sets, Generator Sets, इमारतींसाठी वापरण्यात येणाऱ्या सुविधा, परगुती उपकरणे इत्यादींची सभोवतालच्या हद्दीतील ध्वनी प्रदूषण गुणवत्ता खाली नमूद केल्याप्रमाणे असेल.

..३..

- **कायदेशीर तरतूद :**

६. महापालिकेने परवानगी दिल्यानुसारच मंडप/स्टेज इ. उभारणे संबंधित मंडळावर बंधनकारक आहे. परवानगी व्यतिरिक्त संबंधित मंडळाने मंडप/स्टेज इ. उभारल्याचे निदर्शनास आल्यास ते मनपा परिमंडळ उपायुक्त/संबंधित प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त यांनी पोलीस अधिकाऱ्यांच्या मदतीने काढून टाकण्यात येईल व संबंधितांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच महानगरपालिकेने दिलेल्या सूचनेनुसार मंडप/स्टेज नसल्यास सदरचा मंडप/स्टेज ठाणे महानगरपालिका पूर्वसूचना न देता काढू शकते.

७. पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र. ईएनव्ही-२०१०/प्र.क्र.१०६/ ता.क. ३ दि. ०३.०५.२०११ अन्वये दिलेल्या निर्देशांप्रमाणे सार्वजनिक उत्सव साजरे करणारी मंडळे यांचेकडून सर्व नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे.

८. महाराष्ट्र शासनाचे पर्यावरण विभाग, वन विभाग, नगर विकास विभाग व इतर विभागांनी वेळोवेळी पारित केलेल्या शासन निर्णय व मा. उच्च न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायलयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे पालन संबंधित मंडळांनी करणे बंधनकारक आहे.

- दक्षता :

९. ज्या प्रस्तावित मंडप/स्टेज इ. उभारणीची जागा ही परिवहन सेवेच्या बस मार्गावर असेल त्या रस्त्यावर मंडप/स्टेज इ. उभारणेकरीता किमान १२ फुट रुंद जागा ही बसेस, रिक्षा व सार्वजनिक वाहतुकीतील ट्रॅककरिता उपलब्ध राहील याची दक्षता घेण्यात यावी.

१०. संबंधित मंडळाने मंडप/स्टेज इ. यांची उभारणी करताना ते रोड जंक्शनपासून किमान रस्त्याच्या रुंदीच्या अर्धे याप्रमाणे जंक्शनपासून लांब राहील जेणेकरुन वाहने वळविणे सोपे होईल अशा पध्दतीने कार्यवाही करावी.

११. संबंधित मंडळास मंडप/स्टेज इ. उभारणी करण्यासाठी कोणत्याही ठिकाणचा सिमेंट काँक्रीट रस्ता अथवा पॅसेज असलेल्या पृष्ठभागावर खोदाई करण्याकरिता परवानगी देण्यात येणार नाही. अशा ठिकाणी मंडप घालावयाचे झाल्यास वाळूने भरलेल्या ड्रमवर मंडप/स्टेज याकरिता आवश्यक असणारे बांबू रोवून त्यापासून अथवा पूर्वनियोजित व्यवस्थापनाप्रमाणे मंडप/स्टेज याकरिता बांबू रोवण्यात यावेत. रस्ते/सार्वजनिक खोदाई करुन मंडप/स्टेज इ. उभारणी केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित मंडळावर रस्ते अनाधिकृतपणे खोदाईबाबत कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

१२. ज्या ठिकाणी पक्क्या स्वरुपाचे रस्ते दुभाजक आहेत अशाठिकाणी पदपथ व दुभाजक यामधील रस्त्याच्या भगातील १२ फुटा व्यतिरिक्त उर्वरित जागेत मंडपाची उभारणी संबंधित मंडळाने करावी.

..२..

२०. आवाजाच्या संबंधीत सभोवतालच्या हवेच्या गुणवत्तेचा दर्जा

| क्षेत्र संकेतांक | क्षेत्र / झोन प्रवर्ग | डेसि (ए) एल ईक्यू दिवसा | मधील मर्यादा रात्री |
|---|---|---|---|
| (अ) | औद्योगिक क्षेत्र | ७५ | ७० |
| (ब) | वाणिज्यिक क्षेत्र | ६५ | ५५ |
| (क) | निवासी क्षेत्र | ५५ | ४५ |
| (ड) | शांतता क्षेत्र | ५० | ४० |

टीप :-

१. दिवसा म्हणजे सकाळी ६.०० ते रात्री १०.०० पर्यंत
२. रात्री म्हणजे १०.०० ते सकाळी ६.०० पर्यंत
३. शांतता क्षेत्र म्हणजे रुग्णालये, शैक्षणिक संस्था, न्यायालये, धार्मिक ठिकाणे किंवा सक्षम प्राधिकरणाने अशी क्षेत्रे म्हणून घोषित केलेली इतर कोणतीही क्षेत्रे यांच्या सभोवतालच्या १०० मीटरपर्यंतच्या क्षेत्राचा समावेश असलेली क्षेत्रे.
४. संमिश्र क्षेत्र हे वर नमूद केलेल्या चारांपैकी एक क्षेत्र असल्याचे सक्षम प्राधिकरणाकडून घोषित करण्यात येईल.

२१. ध्वनी प्रदूषणाच्या प्राप्त झालेल्या तक्रारींची नोंद ठेवण्यासाठी स्वतंत्र रजिस्टरची व्यवस्था केलेली आहे. प्राप्त झालेली ध्वनी प्रदूषणाची तक्रार कार्यवाहीसाठी संबंधित पोलीस स्टेशनला व पोलीस कंट्रोल रुमला अग्रेषीत करण्यात येणार आहे.

- शांतता क्षेत्र जाहीर करणे :

२२. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांना शांतता क्षेत्र अधिसूचना क्रमांक ठामपा/आयुक्त/२२४३/०९ व अधिसूचना क्र. ठामपा/आयुक्त/१७९५/२०११ अन्वये १२ शांतता क्षेत्र जाहीर केलेले आहेत.

- तक्रार निवारण व्यवस्था :

२३. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ठाणे महानगरपालिकेने सार्वजनिक उत्सवाच्यावेळी अनाधिकृतरित्या उभारलेल्या मंडपांबाबत तसेच ध्वनी प्रदूषणाबाबत, नागरिकांच्या तक्रारी स्वीकारण्यासाठी सद्यस्थितीत कार्यान्वीत असलेली आपत्कालिन विभागाची टोल फ्री नंबर, ई-मेल सुविधा, एस.एम.एस. सुविधा खालीलप्रमाणे उपलब्ध केलेली आहे व त्यास उचित प्रसिध्दी देण्यात येत आहे.

टोल फ्री नंबर : १८०० २२२ १०८

ई-मेल : rdmc@thanecity.gov.in

SMS सुविधा - ७५०६९४६१५५

..४..

२४. वरीलप्रमाणे आदेश आपत्कालिन विभागाला दिलेले असून सर्व सहाय्यक आयुक्त, सर्व उप आयुक्त, अतिरिक्त आयुक्त १ व २ यांना उचित कार्यवाहीसाठी अग्रेषीत केलेले आहेत.

२५. हया धोरणाप्रमाणे - २०११ करण्यात आलेले धोरण अधिक्रमित करण्यात येत आहे.

२६. ध्वनी प्रदूषण तसेच इतर प्रदूषण होणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी मंडळाची राहील.

२७. पोलीस, वाहतूक यंत्रणा, शासन यंत्रणा यांना दिलेले सर्व निर्देश यांचे काटेकोर पालन करणे मंडळास बंधनकारक राहील.

---